# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 13/11/2023 (सोमवार) सकाळ

## सदोष मनुष्यवध

पो.स्टे. नरखेड :— अंतर्गत २६ किमी अंतरावर मौजा शेमडा शेत शिवार येथे दिनांक १२/११/२०२३ चे १५.३० वा. ते १८.३० वा. दरम्यान मृतक आरोपी नामे— बारीकराम फदाली कडवे, वय ८० वर्ष, रा. शेमडा ता. नरखेड याने स्वत:चे शेतात पिकाचे जनावरापासुन संरक्षण करीता केलेल्या कुंपनाच्या तारेला ईलेक्ट्रीक करंट लावल्याने तो करंट स्वत:ला व सोबत असलेला आजोबाचा नातू नामे— तुषार अरून डोंगरे वय ०९ वर्षे याला लागुन मरण पावला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— गजानन बारीकराम कडवे, वय २६ वर्ष, रा. शेमडा ता. नरखेड जि. नागपुर

यांच्या रिपोर्टवरून पोस्टे नरखेड येथे आरोपींविरुध्द कलम ३०४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक सारीका गुरूकर मॅडम मो. क्र. ९६६५८३४९९९ या करीत आहे.

## जबरी चोरी

पो.स्टे. कळमेश्वर:— अंतर्गत १५ किमी अंतरावर कोहळी मोहळी शिवार कळमेश्वर येथे दिनांक १२/११/२०२३ चे रात्री ०२.०० वा. ते ०२.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— गोपीचन्द्र बनवारीलाल गौतम, वय २८ वर्ष, रा. गाव ऊमापुर कटला पो.स्ट बवनी हेटार, थाना मांडा तहसील मेजा, जिल्हा प्रयागराज (उत्तरप्रदेश), ह. मु. कोहळी रेल्वेस्टे (रुम) व त्याचे मित्र हे रूममध्ये हजर असता यातील अनोळखी आरोपीतांनी फिर्यादी व त्याच्या साथीदाराला रुम मध्ये बंद करुन त्यांना टिकास व सब्बलचा धाक धाकवुन रेल्वेचा स्क्रॉप माल अंदाजे ५५,०००/— रुपयाचा मुद्देमाल तसेच फिर्यादी व त्याचे साथीदाराचे ०७ अँन्डरॉइड मोबाईल फोन किंमती अंदाजे ४९०००/— रुपये असा एकुण १,०४,०००/— रुपयाचा मुद्देमाल चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोस्टे कळमेश्वर येथे ०४ अनोळखी आरोपींविरुध्द कलम ३९२ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपींचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. पोटभरे, मो. नं. ८३२९७७७७९१ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर